# प्रेसनोट

दिनांक- ०५/०१/२०१९

## कल्याण कारागृहामधील तुरुंग अधिकारी यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक ०५/०१/२०१९ रोजी, कल्याण, आधारवाडी कारागृहामधील तुरुंग अधिकारी **अरुण जयसिंग मदने, वय ४९ वर्षे** व खाजगी इसम **किशोर शामराव काळे, ४५ वर्षे** यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १०,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या कल्याण कारागृहामध्ये बंदी असलेल्या मुलास कारागृहात त्रास न देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०१/०१/२०१९ पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिट यांनी सापळ्याचे आयोजन करुन लोकसेवक **अरुण जयसिंग मदने** यांच्यावतीने खाजगी इसम **किशोर शामराव काळे** यांना तक्रारदार यांच्याकडून १०,०००/- रुपयांची लाच स्विकारताना कारागृहाच्या आवारात रंगेहात पकडण्यात आले व लोकसेवक **अरुण जयसिंग मदने** यांना ताब्यात घेण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास श्री. संजय सादिगले, पोलीस निरीक्षक, ॲसीबी, ठाणे हे करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८६५२६६९७९७ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner